**करिअर कट्टा :०९ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र, आणि विद्या प्रसारक मंडळाचे जोशी बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त)ठाणे, यांच्या संयुक्त विद्यमाने "करिअर कट्टा युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी" अंतर्गत कार्यशाळेचे आयोजन.

दि.०९ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता, क्रांतीदिनाचे औचित्य साधून आणि भारतीय स्वातंत्र्याचा ७५वा अमृत महोत्सव साजरा करताना ७५,००० युवकांच्या उपस्थित ७५ मिनिटांचा "युवकांच्या करिअरच्या विविध दिशा व पुढील ७५ वर्षातील भारताचे व्हिजन" या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन आभासी मंचाद्वारे करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी आभासी मंचाद्वारे तज्ञ मार्गदर्शक म्हणून मा.संदीप वासलेकर (अध्यक्ष,स्ट्रॅटेजिक फोरसाइट ग्रुप) महेश भागवत(IPS, पोलीस आयुक्त, राजकोंडा,हैद्राबाद),डॉ.धनराजमाने (संचालक,उच्च शिक्षण,महाराष्ट्र शासन),डॉ.संजय जगताप(सहसंचालक,उच्चशिक्षण विभाग,पनवेल),मा.यशवंतशितोळे(करिअर कट्टा, संचालक),मा.दिनेश पवार( सदस्य पोलीस भरती प्रशिक्षण),मा.जयंत लेकुरवाळे(अध्यक्ष,UPSCराज्यस्तरीय समिती), डॉ.सीमा बाजी(अध्यक्ष,आर्थिक साक्षरता अभियान),मा. प्रिती महाजन (करियर कट्टा समन्वयक ,मुंबई )उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना जोशी - बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सुचित्रा नाईक मॅडमयांनी "युवक जेवढा चांगला घडेल तेवढा भारत बलशाली होईल" सांगत या कार्यक्रमाच्या आयोजनामागील मर्म समजावले. सगळ्याच गोष्टींच्या केंद्रस्थानी युवक आहे, व या वर्षी भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्ष पूर्ण होत असून जगातील सर्वात मोठी भारतीय लोकशाही आहे,अशा या राष्ट्राला घडविणारा युवक तयार व्हायला हवा असे सांगत बलशाली भारत होण्यासाठी युवक महत्वाचा आहे, हे समजावले.

तज्ञ मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन करताना कार्यशाळेची सुरुवात मा.संदीप वासलेकरयांनी केली.सरांनी सांगितले की देशाच्या प्रगतीसाठी नेते,प्रशासकीय वर्ग, पॉलिसीमेकर यांचा हातभार लागेलच पण सोबत पालक,शिक्षक,विद्यार्थी यांनी ही आतापासूनच योगदान द्यायला हवे हे समजावले.२०४७ मध्ये भारत कसा असेल या दृष्टीने करिअरचे नियोजन करा, हा मौलिक सल्ला या निमित्ताने दिला.भारत शेतीप्रधान देश असून आपण इतर क्षेत्रात कितीही पुढे गेलो तरी शेती हा महत्वाचा अंग अर्थ व्यवस्थेत राहणार आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांनी भारताच्या विकासाचा विचार करताना आधुनिक शेती आणि पाणी नियोजन ह्या विषयात कौशल्य मिळवावे. सोबतच पर्यावरणशास्त्र,कृत्रिम बुद्धिमत्ता,अवकाश तंत्रज्ञान,आणि या सोबतच वैश्विक्तेचा विचार करताना आधुनिक तत्वज्ञानाची कासही युवकांनी धरायला हवी म्हणत युवकांनी भाषा आणि कला यांचाही विचार करावा लागेल याची जाणीव करुन दिली.पण सोबतच चारित्र्य, नैतिकता यांची बैठक महत्वाची आहे हे ही समजावले.

या कार्यशाळेतील पुढील पुष्प मा.महेश भागवतयांनी गुंफले, सर नुकतेच कोरोना आजारातून बरे होत असताना अशा परिस्थितीतही युवकांना मार्गदर्शन करण्यास उपस्थित राहिले.त्यांनी प्रशासकीय सेवेबद्दल,UPSC परीक्षेबाबत मार्गदर्शन केले. ध्येयाकडे वाटचाल करणारी माणसे धडपडत असतात असे म्हणतात, पण खरे तर ती धडपडत नसून घडत असतात,असे सांगत ध्येयाकडे वाटचाल करताना पळवाट न शोधता स्मार्टवर्क आणि हार्डवर्क करा.यात स्मार्टवर्क निवडा म्हणत विद्यार्थ्यांना यशाचा कानमंत्र दिला, सोबतच भारतीय वनसेवा परीक्षेबद्दल माहिती दिली.

डॉ.संजय जगतापयांनी मार्गदर्शन करताना आपले भविष्य आपणच घडविले पाहिजे याची जाणीव विद्यार्थ्यांना करून दिली. या करिअर कट्टा मधून बळ मिळते,उत्साह मिळतो हे सांगत स्पर्धा परीक्षांमध्ये आपला टक्का वाढायला हवा याबाबत जागृती निर्माण केली.

मा.यशवंत शितोळेयांनी पुढील ७५ वर्षाच्या व्हिजनचा विचार हा करिअर कट्टा देत असल्याची आठवण युवकांना करून दिली.उद्योजक निर्माण व्हावेत,कृतिशील निर्माण व्हावेत यासाठी हा कट्टा कार्यरत आहे,त्यासाठी वेगवेगळ्या प्रशिक्षणाची सोय केलेली आहे याबाबतही मार्गदर्शन केले.व्हिजन लिमिटेड नको याची जाणीव सरांनी युवकांना करून दिली. स्वप्न हे झोप उडवणारे हवे आणि ते काम करिअर कट्टा करत आहे सांगत करिअर कट्ट्याचे महत्व अधोरेखित केले.

मा.दिनेश पवारयांनी पोलीस भरती विषयी मार्गदर्शन केले.यासाठी करिअर कट्टा वक्तृत्व,कर्तुत्व,नेतृत्व,प्रभुत्व युवकांमध्ये उभे राहण्यासाठी काम करत असल्याचे समजावले, दिवसातील चोवीस तासांपैकी दोन तास नियोजबद्धतेने आपल्या भवितव्यासाठी द्यायला हवेत याची जाणीव युवकांना करून दिली.

मा.जयंत लेकुरवाळेयांनी मार्गदर्शन करताना स्पर्धा परीक्षांबदल मार्गदर्शन केले.व करिअर कट्टा स्फुल्लिंग चेतविण्याचे कार्य करत असल्याचे अधोरेखित केले.

डॉ.सीमा बाजीयांनी मार्गदर्शन करताना आर्थिक नियोजनाचे महत्त्व समजावत, आर्थिक नियोजन, बजेट यांचे शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांना शिक्षण द्यायला हवे तरच तो पुढे जाऊन आर्थिक नियोजन करू शकेल याची खात्री दिली.

*कार्यक्रमासाठी इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड या संस्थेचे प्रतिनिधी ज्युरी म्हणून उपस्थित होते.एवढ्या मोठ्या स्तरावर ७५,००० युवक अशा प्रकारे आभासी मंचाद्वारे एकत्र येणे हा विक्रम असून त्याची नोंद सदर प्रतिनिधींनी घेतली.या संस्थेचे प्रतिनिधी श्री.विश्वजित रॉय चौधरी यांनी सदर विक्रमाबद्दल सन्मानपत्र आणि मेडल देऊन जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सुचित्रा नाईक आणि करिअर कट्टा याचे मा.यशवंत शितोळे यांना सन्मानित केले.
कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ.प्रिती महाजनयांनी केले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.सुभाष शिंदे, उपप्राचार्या डॉ.प्रियंवदा टोकेकर,उपप्राचार्य डॉ.महेश पाटील त्यासोबतच महाविद्यालयाच्या 'आजादी का अमृत महोत्सव' याकार्यक्रमाचे समन्वयक,सर्व समिती प्रमुख,प्राध्यापक या सर्वांनी मोलाचे योगदान दिले.
या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका श्वेता अहिरेयांनी केले.




